190257 Aviva Dhan Samruddhi KF size: 14.21x8.25”

SSV = [(प्रदत्य केलेली हमी रक्कम अधिक जमा खात्रीशीर भर) x SSV घटक] वजा [अगोदरच दिलेला सर्वायवल लाभ, काही असल्यास]

IRDAI ची मंजुरी मिळाल्यानंतर नियामक आवश्यकतांनुसार कंपनीद्वारा विशेष सरेंडर मूल्य घटकात (SSV) वेळोवेळी सुधारणा केली जाऊ शकते.

**करलाभ:**
करलाभ हे चालू कर कायद्यांनुसार असतील. कर कायद्यात बदल होऊ शकतात.

**नामांकन आणि नेमणुक:**
विमा कायदा, 1938 मधील कलम 39, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यात व्याख्या केल्यानुसार ह्या पॉलिसी अंतर्गत नामांकन करण्याची परवानगी आहे.

विमा कायदा, 1938 मधील कलम 38, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, यात व्याख्या केल्यानुसार ह्या पॉलिसी अंतर्गत नेमणुक करण्याची परवानगी आहे.

**मोफत पाहणी कालावधी**

तुम्हाला पॉलिसीचे दस्तऐवज मिळाल्यापासून 15 दिवसांचे आत (दूरस्थ विपणन पद्धतीने पॉलिसी विकली असल्यास 30 दिवसांचे आत) पॉलिसीचे नियम व अटी यांचा आढावा घेण्याचा अधिकार आहे. तुम्हाला कोणतेही नियम व अटी मान्य नसल्यास, तुमच्या हरकतीचे कारण नमूद करून तुम्हाला पॉलिसी परत करण्याचा अधिकार आहे. त्यानंतर तुम्ही वैद्यकीय तपासणीचा खर्च, काही असल्यास, आणि मुद्रांक शुल्क वजा जाता भरलेली हप्त्याची रक्कम परत मिळण्यास पात्र असाल.

**आत्महत्येचा दावा:**

पॉलिसी अंतर्गत जोखीम सुरू झाल्याच्या तारखेपासून किंवा पॉलिसीच्या पुनरुज्जीवनच्या तारखेपासून, लागू असेल त्याप्रमाणे, 12 महिन्यांच्या आत विमाधारकाचा आत्महत्येमुळे मृत्यू झाल्यास, पॉलिसी कार्यान्वित असल्यास, नामनिर्देशित व्यक्ती किंवा पॉलिसीचा लाभधारक मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या हप्त्याच्या किमान 80% किंवा मृत्यूच्या तारखेला असलेले सरेंडर मूल्य, ह्यापैकी जे अधिक असेल ते, मिळण्यास पात्र असेल.

**अविवा धन समृद्धी - हप्ता भरण्याविषयी**

- हप्ता प्रदत्य वारंवारितेनुसार वार्षिकीकृत हप्त्याला मोडल घटकाने गुणून खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे हप्त्याची रक्कम निश्चित करण्यात येईल:

| हप्ता प्रदत्य वारंवारिता | मोडल घटक |
|---|---|
| वार्षिक | 1.0000 |
| सहामाही | 0.5108 |
| तिमाही | 0.2591 |
| मासिक | 0.0871 |

कोणत्याही पॉलिसी वर्धापनाला विनंती करून, अल्टरेशन शुल्क, जे ₹100/- अधिक कर, काही असल्यास, इतके असून ते भरण्याच्या अधीन राहून वेगवेगळ्या हप्ता प्रदत्य पद्धतीत बदल करता येईल

**नमुना हप्ताचा दर**

- निर्देशक हप्ताचे दर (प्रत्येक ₹1000 हमी रकमेसाठी)

| वय | पॉलिसीची मुदत | | |
|---|---|---|---|
| | 10 | 15 | 20 |
| 35 | 89.75 | 74.75 | 65.85 |
| 45 | 91.16 | 76.87 | 68.91 |

- **उच्च हमी रकमेसाठी सूट:** तुम्ही खाली तपशीलवार दाखविल्याप्रमाणे हप्तावर सूट मिळण्यास पात्र आहात:

| हमी रकमेचे प्रमाण | सूट (प्रत्येक ₹1000 हमी रकमेसाठी) |
|---|---|
| >= 2.65 L & < 5 L | काही नाही |
| >= 5 L & < 10 L | 4.0 |
| >= 10 L | 5.0 |

- सरकारद्वारा वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे, वस्तू व सेवा कर, उपकर लागू असेल त्याप्रमाणे कर, आकारण्यात येतील परंतु त्यास तितकीच मर्यादा नाही. कर कायद्यात बदल होऊ शकतात

**स्वीकार**

जोखीम स्वीकारेपर्यंत आणि संपूर्ण हप्त्याची रक्कम मिळेपर्यंत अविवा कोणत्याही दाव्याचे पैसे देण्यास बांधिल नसेल.

**अविवामध्ये गुंतवणूक का करावी?**

अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड ही डाबर इन्व्हेस्ट कॉर्पोरेशन आणि अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड - यूके (UK) तील विमा कंपनी यांचा संयुक्त उपक्रम आहे ज्यांचा भारताशी 1834 पासून संबंध आहे. अविवा लाईफ इन्शूरन्सची निवड केल्यास तुम्हाला जगातील एका सर्वाधिक जुन्या विमा समुहाचा व्यवस्थापनाच्या अनुभवाचा लाभ मिळतो ज्यांना 1696 पासूनचा इतिहास आहे.

1884 साली स्थापन करण्यात आलेला डाबर हा भारतातील एक सर्वाधिक जुना आणि मोठा कंपनी समुह आहे. हा पारंपारिक आरोग्यसेवा उत्पादने बनविणारा देशातील एक अग्रणी उत्पादक आहे.

**कलम 41**

विमा कायदा, 1938 मधील कलम 41 मध्ये असे नमूद करण्यात आले आहे (1) कोणीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्याच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरू ठेवण्यासाठी कोणाही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हप्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कोणीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही.

(1) जर एखाद्या विमा एजंटने त्याच्या स्वत:च्या जीवनावर स्वत: जीवन विमा पॉलिसी घेण्याच्या संदर्भात कमिशनचा स्वीकार केला तर तो ह्या उपकलमाच्या अर्थाच्या अंतर्गत हप्तामध्ये सूट स्वकारले असे गृहित धरले जाणार नाही जर अशा प्रकारे स्वीकारताना विमा एजंटाने तो विमा कंपनीने नेमणुक केलेला अधिकृत विमा एजंट आहे असे सिद्ध करणाऱ्या विहित अटींची पूर्तता केली पाहिजे.

(2) ह्या कलमाच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत कोणाही व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, दंड आकारला जाईल जो रू. दहा लाख पर्यंत वाढविला जाऊ शकतो.

**कलम 45**

विमा कायदा, 1938 मधील कलम 45, वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार, 3 वर्षांनंतर चुकीच्या विधानासाठी पॉलिसीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित करता येणार नाही.

**चौकशी आणि तक्रारी:**
अधिक माहिती, चौकशी आणि तक्रारीसाठी,
कृपया आमच्याशी खालील क्रमांकांवर संपर्क साधा:

1800-103-7766 (BSNL/MTNL ग्राहकांसाठी टोल फ्री) किंवा
0124-2709046 किंवा 5676737 वर "Aviva" SMS करा.

फॅक्स क्रमांक.: 0124- 2571210

AVIVA
| Life Insurance |

*डाबर इन्व्हेस्ट कॉर्पो. आणि*
*अविवा इंटरनॅशनल होल्डिंग्स लिमिटेड यांचा संयुक्त उपक्रम*

**अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड**
**मुख्य कार्यालय:** अविवा टॉवर, सेक्टर रोड, गोल्फ कोर्ससमोर,
DLF फेज-V, सेक्टर 43, गुरगाव-122003, हरयाणा, भारत.
फोन क्र.: +91 124-2709000, फॅक्स क्र.: +91 124-2571210
वेबसाईट: www.avivaindia.com
ई-मेल: customerservices@avivaindia.com
**नोंदणीकृत कार्यालय:** 2रा मजला, प्रकाशदीप बिल्डिंग,
7, टॉल्स्टॉय मार्ग, नवी दिल्ली-110001, भारत.
कॉर्पोरेट ओळख क्रमांक (CIN): U66010DL2000PLC107880

खोटे फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा IRDA द्वारा जनतेस स्पष्टिकरण देण्यात आहे की : • IRDA किंवा त्यांचे अधिकारी कोणतीही विमा किंवा आर्थिक उत्पादनांच्या विक्रीत सहभागी होत नाहीत किंवा हप्त्याची गुंतवणूक करत नाहीत. • IRDA द्वारा कोणत्याही प्रकारच्या बोनसची घोषणा करण्यात येत नाही. अशा प्रकारचे कॉल्स स्वीकारणाऱ्या जनतेस दूरध्वनी क्रमांकाचा तपशिल, क्रमांक अशा माहितीच्या तपशिलासह त्या संबंधात पोलीसात तक्रार करण्याची विनंती करण्यात येत आहे.

अविवा धन समृद्धी ही व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत जीवन विमा योजना आहे. वर प्रदर्शित करण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अविवा ब्रँडस लिमिटेड यांचे आहेत आणि अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमिटेड द्वारा त्यांचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. अविवा लाईफ इन्शूरन्स कंपनी इंडिया लिमि. IRDA भारत नोंदणी क्र.122. करलाभ हे विद्यमान करकायद्यांनुसार आहे ज्यात बदल होऊ शकतात. हेल्पलाइन नंबर: 1800-180-22-66/ 1800-103-77-66, UIN: 122N097V04, Advt. No.: Dec 52/19

INDIA PARTNER | Dabur GROUP

# अविवा धन समृद्धी



AVIVA
| Life Insurance |



**व्यक्तिगत नॉन-लिंक्ड असहभागी बचत जीवन विमा योजना**

आपली भविष्यातील गुंतवणुकीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आपण जेव्हा बचत करत असतो तेव्हा अल्पकालावधीसाठी लागणाऱ्या पैशांची तजवीज करण्याचे आपण विसरण्याची शक्यता असते. अविवामध्ये आम्हाला माहित आहे की तुम्हाला दीर्घ मुदतीसाठी निधी जमा करण्याची इच्छा आहे आणि त्याचबरोबर तुम्हाला अल्पकालावधीच्या गरजा पूर्ण करण्याची लवचिकता देखील हवी आहे.

सादर आहे अविवा धन समृद्धी: बचत-तथा-संरक्षण योजना जी तुम्हाला भविष्यातील गुंतवणुकीसाठी निधी जमा करण्यास मदत करते तर पॉलिसीच्या मुदतीत तुम्हाला ठराविक कालांतराने मनी बॅक देते, ज्यामुळे तुम्ही तुमच्या नियमित आर्थिक गरजा अगदी सहज पूर्ण करू शकता.

## अविवा धन समृद्धी - खास आकर्षणे

- **खात्रीशीर परतावा:** तुमच्या पॉलिसीत एक वर्षाच्या हप्त्याच्या द.सा. 7% दराने ते द.सा. 9% दराने पैसे जमा होतात (तुम्ही निवडलेल्या पॉलिसीच्या मुदतीनुसार पॉलिसीच्या मुदत अखेरपर्यंत).
- **लिक्विडिटी:** तुमची पॉलिसी दर 5 वर्षांनी (परिपक्वतेव्यतिरिक्त) एक वर्षाच्या हप्त्याच्या 125% इतकी रक्कम परत देते.
- **खात्रीशीर परिपक्वता लाभ:** परिपक्वतेला, तुम्हाला हमी रक्कम अधिक जमा खात्रीशीर भर वजा अगोदरच दिलेला सर्वायवल लाभ इतकी रक्कम मिळते.
- **उच्च हमी रकमेसाठी सूट:** तुमची हमी रक्कम रू.5 लाख किंवा अधिक असल्यास तुम्हाला मूळ हप्त्याच्या रकमेवर सूट मिळते.

‘‘एक वर्षाचा हप्ता’’ म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्त्याची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते आणि विमालेखनानुसार अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, इतकी असेल.

## अविवा धन समृद्धी - पात्रता

| | |
|---|---|
| **प्रवेशाचे वेळी वय** | किमान: 13 वर्ष मागील वाढदिवसाला<br>कमाल 55 वर्ष मागील वाढदिवसाला |
| **परिपक्वतेला वय** | 23 ते 70 वर्ष |
| **पॉलिसीची मुदत** | 10, 15 किंवा 20 वर्ष, जे कमाल परिपक्वता वयाच्या अधीन असेल. |
| **हप्ता प्रदत्य मुदत** | पॉलिसीच्या सर्व मुदतींसाठी 10 वर्ष |
| **हमी रक्कम** | (खालील तक्ता पहा) |
| **किमान हप्ता** | (खालील तक्ता पहा) |
| **कमाल हप्ता** | (खालील तक्ता पहा) |
| **हप्ता प्रदत्य वारंवारिता** | वार्षिक, सहामाही, तिमाही आणि मासिक- मासिक पद्धतीसाठी फक्त ECS/डायरेक्ट डेबिटची परवानगी आहे. |

**हमी रक्कम**

**किमान**

| पॉलिसीची मुदत | किमान हमी रक्कम |
|---|---|
| 10 | 400,000 |
| 15 | 265,000 |
| 20 | 265,000 |

**एका जीवनासाठी कमाल हमी रक्कम:** 5 कोटी मंडळाने मंजूर केलेल्या विमालेखन पॉलिसीच्या अधीन राहून

**किमान हप्ता**

| पॉलिसीची मुदत | प्रत्येक पद्धतीसाठी किमान हप्ता | | | |
|---|---|---|---|---|
| | वार्षिक | सहामाही | तिमाही | मासिक |
| 10 | 35,692 | 18,231 | 9,248 | 3,109 |
| 15 | 19,599 | 10,011 | 5,078 | 1,707 |
| 20 | 17,130 | 8,750 | 4,438 | 1,492 |

**कमाल हप्ता**

| पॉलिसीची मुदत | कमाल हप्ता प्रत्येक पद्धतीसाठी | | | |
|---|---|---|---|---|
| | वार्षिक | सहामाही | तिमाही | मासिक |
| 10 | 47,52,500 | 24,27,577 | 12,31,373 | 4,13,943 |
| 15 | 41,26,000 | 21,07,561 | 10,69,047 | 3,59,375 |
| 20 | 36,06,000 | 18,41,945 | 9,34,315 | 3,14,083 |

**कृपया नोंद घ्यावी:**

1. सरकारद्वारा वेळोवेळी अधिसूचित केल्याप्रमाणे, वस्तू व सेवा कर, उपकर लागू असेल त्याप्रमाणे कर, आकारण्यात येतील परंतु त्यास तितकीच मर्यादा नाही. कर कायद्यात बदल होऊ शकतात.
2. पॉलिसीच्या प्रस्थापनेला विमाधारक अल्पवयीन असल्यास.
   - जोखीम ताबडतोब सुरू होईल.
   - पॉलिसीधारक हप्त्याची रक्कम भरेल जे विमाधारकाचे एकतर आईवडिल किंवा आजीआजोबा किंवा कायदेशिर पालक असतील. हप्ता प्रदत्य कालावधी पूर्ण होण्यापुर्वी पॉलिसीधारकाचा मृत्यू झाल्यास, विमाधारकाचे जिवंत असलेले आईवडिल/कायदेशिर पालक भविष्यातील हप्ते भरू शकतात. विमाधारक अल्पवयीन असल्यास आणि भविष्यातील हप्ते न भरल्यास, रद्द/प्रदत्य केलेल्या पॉलिसीची तरतूद लागू होईल.
   - विमाधारक अल्पवयीन असताना पॉलिसीधारकाचा मृत्यू झाल्यास, आवश्यक अर्ज आणि कंपनीला आवश्यक असलेले दस्तऐवज सादर केल्यानंतर विमाधारकाचे जिवंत आईवडिल/कायदेशीर याच्या नावे पॉलिसी होईल.
   - विमाधारकाचे मागील वाढदिवसाला वय 18 वर्ष पूर्ण झाल्यानंतर पॉलिसी आपोआप त्याच्या/तिच्या नावे होईल.

## अविवा धन समृद्धी - फायदे

- खात्रीशीर भर: पॉलिसीच्या निवडलेल्या मुदतीनुसार तुम्ही खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे खात्रीशीर भर मिळण्यास पात्र ठराल. खात्रीशीर पैसे जमा करण्याच्या वेळी जर सर्व देय हप्ते भरले असतील तर पॉलिसीच्या कालावधीत प्रत्येक पॉलिसी वर्षाच्या अखेरीस एका पॉलिसी वर्षासाठी खात्रीशीर भर जमा करण्यात येईल. जमा खात्रीशीर भर एकतर परिपक्वता लाभाच्या वेळी किंवा विमाधारकाचा मृत्यू झाल्यास त्यावेळी देण्यात येईल.

| एका वर्षाच्या हप्त्याच्या * % इतकी द.सा. खात्रीशीर भर | पॉलिसीची मुदत (वर्षात) | | |
|---|---|---|---|
| | 10 | 15 | 20 |
| | 7% | 8% | 9% |

*‘‘एक वर्षाचा हप्ता म्हणजे पॉलिसीधारकाने निवड केलेली एका वर्षात देय हप्त्याची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते आणि करारानुसार अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, इतकी असेल.

- **सर्वायवल लाभ:** सर्वायवल लाभाचे पैसे देण्याच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास तुम्हाला परिपक्वते व्यतिरिक्त प्रत्येक 5 व्या पॉलिसी वर्षाच्या अखेरीस एक वर्षाच्या हप्त्याच्या 125% इतका खात्रीशीर सर्वायवल लाभ मिळेल.

| पॉलिसीची मुदत (वर्षात) | पॉलिसी वर्षाच्या अखेरीस देय सर्वायवल लाभ |
|---|---|
| 10 | 5th |
| 15 | 5th, 10th |
| 20 | 5th, 10th, 15th |

‘‘एक वर्षाचा हप्ता’’ म्हणजे पॉलिसीधारकाने निवड केलेली एका वर्षात देय हप्त्याची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते आणि विमालेखनानुसार अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, इतकी असेल.

- **परिपक्वता लाभ:** सर्व देय हप्ते भरले असल्यास, तुम्हाला हमी रक्कम अधिक परिपक्वतेपर्यंत जमा खात्रीशीर भर (GA) वजा अगोदरच दिलेला सर्वायवल लाभ (SB) इतका खात्रीशीर परिपक्वता लाभ मिळेल.

**उदाहरण:**
**पॉलिसीची मुदत:** 20 वर्ष




‘‘एक वर्षाचा हप्ता’’ म्हणजे पॉलिसीधारकाने निवड केलेली एका वर्षात देय हप्त्याची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते आणि विमालेखनानुसार अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, इतकी असेल.

- **मृत्यू लाभ:** विमाधारकाचा पॉलिसीच्या कालावधीत दुर्दैवाने मृत्यू झाल्यास, मृत्यूच्या तारखेपर्यंत सर्व देय हप्ते भरले असल्यास नामनिर्देशित व्यक्तीला खालील प्रमाणे पैसे देण्यात येतील.

मृत्यू समयी देय रक्कम ही खालील पैकी सर्वाधिक असलेली रक्कम असेल:

a) वार्षिकीकृत हप्त्याच्या 10 पट किंवा

b) मृत्यूच्या तारखेपर्यंत एकुण भरलेल्या हप्त्याच्या 105%

c) पॉलिसीची हमी रक्कम
अधिक मृत्यूच्या तारखेपर्यंत खात्रीशीर भर, अगोदरच दिलेले कोणतेही सर्वायवल लाभ वजा न करता.

‘‘वार्षिकीकृत हप्ता म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्त्याची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते, विमालेखनानुसार अतिरिक्त हप्ते आणि मोडल हप्त्यांसाठी लोडिंग्स, काही असल्यास.

एकुण भरलेल्या हप्ते म्हणजे सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज, वजा अतिरिक्त हप्ता, रायडर हप्ता आणि कर, काही असल्यास.

**उदाहरण:**
**पॉलिसीची मुदत:** 20 वर्ष




‘‘एक वर्षाचा हप्ता’’ म्हणजे पॉलिसीधारकाने निवडलेली एका वर्षात देय हप्त्याची रक्कम, वजा कर, रायडर हप्ते आणि करारानुसार अतिरिक्त हप्ता, काही असल्यास, इतकी असेल.

**सवलत कालावधी :**

‘‘सवलत कालावधी’’ म्हणजे कंपनीद्वारा कोणताही दंड न होता किंवा विलंब शुल्क न भरावे लागता, हप्ता भरण्यासाठी देय तारखेपासून दिलेला कालावधी, ज्या दरम्यान पॉलिसीच्या नियम व अटींनुसार कोणताही खंड न पडता जोखीम संरक्षणासह पॉलिसी कार्यान्वित असल्याचे समजले जाते. हप्ता भरण्यासाठी सवलत कालावधी वार्षिक, सहामाही व तिमाही पद्धतीसाठी 30 दिवस आणि मासिक हप्ता प्रदत्य पद्धतीसाठी 15 दिवस असेल.

**पहिल्या दोन वर्षांच्या कालावधीत नियमित हप्ते भरले न भरणे (किमान पहिले दोन वर्ष हप्ते भरले नाहीत):**

- पहिल्या वर्षाच्या देय हप्ते भरले असल्यास, आणि तुम्ही सवलत कालावधीत पुढील हप्ते भरले नाहीत तर पॉलिसी रद्द होईल.
- तुम्ही सर्व देय हप्ते आणि लागू व्याज व पुनरूज्जीवन शुल्क भरून पहिल्या न भरलेल्या हप्त्याच्या तारखेपासून 5 वर्षांच्या कालावधीत पॉलिसी पुनरज्जीवित करू शकता.
- तुम्ही तुमची पॉलिसी पुनरूज्जीवित न केल्यास, पुनरूज्जीवन कालावधीत एकुण भरलेल्या हप्त्याच्या 30% रक्कम दिल्यानंतर पॉलिसी खंडित होईल.
- पुनरूज्जीवन कालावधीत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, एकुण भरलेल्या हप्त्याच्या 30% रक्कम मृत्यूच्या वेळी देय असेल आणि पॉलिसी खंडित होईल.

एकुण भरलेल्या हप्ते म्हणजे सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज, वजा अतिरिक्त हप्ता, रायडर हप्ता आणि कर, काही असल्यास.

**पहिल्या दोन वर्षांनंतर नियमित हप्ता न भरल्यास (किमान दोन वर्षांचे हप्ते भरले असल्यास):**

- किमान दोन वर्षांचे हप्ते भरले असल्यास आणि तुम्ही सवलत कालावधीत नंतरच्या देय हप्ते न भरल्यास, सवलत कालावधीच्या अखेरीस पॉलिसी प्रदत्य केलेली पॉलिसी होईल आणि तिला प्रदत्य केलेली हमी रक्कम लागू होईल जी खालील प्रमाणे निश्चित करण्यात येईल:

हमी रक्कम x भरलेल्या हप्त्यांची संख्या
पॉलिसी अंतर्गत देय एकुण हप्त्यांची संख्या

प्रदत्य केल्याच्या तारखेनंतर कोणतीही खात्रीशीर भर जमा होणार नाही.

- तुम्ही पहिल्या न भरलेल्या हप्त्याच्या तारखेपासून 5 वर्षांच्या कालावधीत सर्व देय हप्ते आणि लागू व्याज आणि पुनरूज्जीवन शुल्क भरून प्रदत्य केलेली पॉलिसी पुनरूज्जीवित करू शकता.
- प्रदत्य केलेली झाल्यानंतर
  - पॉलिसीच्या मुदतीत विमाधारकाचा मृत्यू झाल्यास, अगोदरच दिलेले कोणतेही सर्वायवल लाभ वजा न करता प्रदत्य केलेली हमी रक्कम अधिक जमा खात्रीशीर भर इतकी रक्कम देय असेल.
  - विमाधारक परिपक्वतेपर्यंत जिवंत राहिल्यास, प्रदत्य केलेली हमी रक्कम अधिक जमा खात्रीशीर भर वजा अगोदरच दिलेले सर्वायवल लाभ, काही असल्यास, इतकी रक्कम देय असेल.
  - तुमची रद्द झालेली/प्रदत्य केलेली पॉलिसी भविष्यातील कोणताही सर्वायवल लाभ मिळण्यास पात्र नसेल आणि भविष्यातील कोणत्याही खात्रीशीर भर रकमेस पात्र नसेल. परंतु, प्रदत्य केलेल्या तारखेपर्यंत जमा सर्व खात्रीशीर भर पॉलिसीसोबत राहील आणि प्रदत्य केलेल्या हमी रकमेसोबत देय असेल.

**पुनरूज्जीवन**

तुम्ही पॉलिसीच्या कालावधीत परंतु पहिल्या न भरलेल्या हप्त्याच्या तारखेपासून 5 वर्षांच्या आत, मंडळाने मंजूर केलेल्या विमालेखनानुसार कंपनीचे समाधान होईल अशा प्रकारे विमाधारकाच्या निरंतर विमायोग्यतेचा पुरावा सादर करून पॉलिसी पुनरूज्जीवित करू शकता, जे पुनरूज्जीवन करण्याची रक्कम आणि सर्व देय हप्ते आणि द.सा. 9% मासिक चक्रवाढ दराने व्याज, अधिक कर, काही असल्यास, भरण्यावर अवलंबून असेल. वैद्यकीय तपासणीचा खर्च, काही असल्यास, तो तुम्हाला सोसावा लागेल. सरेंडर केलेली पॉलिसी पुनरूज्जीवित करता येणार नाही.

कंपनी रद्द केलेली/प्रदत्य केलेली पॉलिसी पुनरूज्जीवित करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. रद्द केलेली/प्रदत्य केलेली पॉलिसी पुनरूज्जीवित करणे हे पुनरूज्जीवन शुल्क भरण्याच्या अधीन असेल, जे ₹250 अधिक कर, काही असल्यास इतके असेल.

**सरेंडर**

- किमान पहिल्या दोन पॉलिसी वर्षाच्या सर्व देय हप्ते भरले असल्यास, चालू असलेली किंवा प्रदत्य केलेली पॉलिसी सरेंडर करता येईल.
- देय सरेंडर मूल्य हे खात्रीशीर सरेंडर मूल्य (GSV) आणि विशेष सरेंडर मूल्य (SSV) ह्यापैकी जे अधिक असेल तितके असेल.

**कोठे:**

GSV = एकुण भरलेल्या हप्ते* × GSV घटक - अगोदरच दिलेला सर्वायवल लाभ

एकुण भरलेल्या हप्ते म्हणजे सर्व मिळालेल्या हप्त्यांची एकुण बेरीज, वजा अतिरिक्त हप्ता, रायडर हप्ता आणि कर.

| सरेंडरचे पॉलिसी वर्ष | GSV घटक | | |
|---|---|---|---|
| | पॉलिसीची मुदत = 10 वर्ष | पॉलिसीची मुदत = 15 वर्ष | पॉलिसीची मुदत = 20 वर्ष |
| 1 | - | - | - |
| 2 | 30% | 30% | 30% |
| 3 | 35% | 35% | 35% |
| 4 | 50% | 50% | 50% |
| 5 | 50% | 50% | 50% |
| 6 | 50% | 50% | 50% |
| 7 | 50% | 50% | 50% |
| 8 | 90% | 75% | 70% |
| 9 | 90% | 80% | 70% |
| 10 | 90% | 90% | 75% |
| 11 | | 90% | 75% |
| 12 | | 90% | 75% |
| 13 | | 90% | 75% |
| 14 | | 90% | 75% |
| 15 | | 90% | 75% |
| 16 | | | 80% |
| 17 | | | 80% |
| 18 | | | 80% |
| 19 | | | 90% |
| 20 | | | 90% |